पुढारी ३
बुधवार, १८ ऑक्टोबर २०२३



कोल्हापूर : शाही दसरा कोल्हापूर महोत्सवात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र, केरळ, आसाम येथील लोकनृत्ये सादर केली. (छाया : नाज ट्रेनर)

# लोकनृत्यांच्या कलाविष्कारांना रसिकांची दाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवदुर्गा लोकनृत्योत्सवाच्या माध्यमातून लोककलांवर आधारित शाही दसरा कोल्हापूर महोत्सवात लोकनृत्यांच्या आविष्काराला रसिकांनी दाद दिली. दसरा चौक येथे आयोजित या कार्यक्रमात गोवा, केरळ, महाराष्ट्रातील लोकनृत्ये स्थानिक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सादर केली.

## शाही दसरा कोल्हापूर महोत्सव

शिवाजी विद्यापीठांतर्गत झालेल्या युवा महोत्सवात विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लोकनृत्य सादर केली होती. यातील काही नृत्यांचा समावेश महोत्सवातील पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमात करण्यात आला. युवा महोत्सवात प्रथम क्रमांक पटकावलेल्या विवेकानंद महाविद्यालयाच्या लोकवाद्यवृंद समूहाने केरळा नटनम नृत्य हे केरळचे वाद्यवृंद सादर केले. बिहू नृत्य, आसामचे लोकनृत्य व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी च्या विद्यार्थ्यांनी नृत्याविष्कार सादर केला.

न्यू कॉलेजच्या कलाकारांनी वाघ्या मुरळी नृत्य, कॉमर्स कॉलेज कमसाले नृत्य, कर्नाटक, यशवंतराव चव्हाण कला व वाणिज्य महाविद्यालय, इस्लामपूरच्या विद्यार्थ्यांनी रायबेंशे नृत्य, पश्चिम बंगालची लोककला सादर केली. श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी येथील विद्यार्थिनींनी जोगवा नृत्य.

विश्वासराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय, शिराळा यांनी गोव्याचे दिवली नृत्य, तर शिवाजी विद्यापीठ सांस्कृतिक संघ कोल्हापूरच्या रणरागिणींवर आधारित स्त्रीशक्ती नृत्य सादर करून रसिकांची मने जिंकली.

सकाळ







**दहिवडी :** शिवाजी विद्यापीठांतर्गत ४३ व्या युवा महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेतेपदाचा मानकरी असलेला कोल्हापूरचा विवेकानंद कॉलेजचा संघ. (दुसऱ्या छायाचित्रात) सरदार बाबासाहेब माने लोककला फिरत्या चषकाचा मानकरी दहिवडी कॉलेजचा संघ. (तिसऱ्या छायाचित्रात) वाई येथील किसन वीर महाविद्यालयाच्या संघाने सरदार बाबासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक पटकावला.

## दहिवडीत शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप : ३४ कलाप्रकारांचे सादरीकरण

# विवेकानंद कॉलेजला सर्वसाधारण विजेतेपद

**दहिवडी, ता. १३ :** क्षणाक्षणाला वाढत जाणारी उत्कंठा, आतुरता, हुरहूर, हृदयाचे वाढलेले ठोके, प्राण कानात आणून निकाल ऐकण्यासाठी सज्ज झालेले स्पर्धक आणि निकाल ऐकताच टाळ्या, शिट्ट्यांसह धमाल नाचून केलेला जल्लोष, तर काहींचा झालेला हिरमोड. अशा तरुणाईच्या उत्साही वातावरणात शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप झाला. विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर हे सर्वसाधारण विजेतेपदाचे मानकरी ठरले. सलग दोन दिवस तब्बल ३४ कलाप्रकारांचे सादरीकरण सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील १०० पेक्षा जास्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी केले.

> कला, क्रीडा प्रकारात जे यशस्वी होतात, ते आयुष्यात नक्कीच यशस्वी होतात. त्यामुळे अभ्यासासोबतच आपले कलागुण जोपासण्याकडे लक्ष द्या.
>
> **-चंद्रकांत दळवी**, कार्याध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा.

काही कला येथील नागरिकांना प्रथमच पाहण्यास मिळाल्या. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी महिना-दोन महिने मेहनत केलेले कलाप्रकार रंगमंचावर सादर करताना जिवाचे रान केले. स्पर्धक कलाप्रकार सादर करताना बेभान होऊन अक्षरशः आपला जीव ओतताना दिसत होते. आपल्या महाविद्यालयासोबतच स्पर्धकांनाही तितक्याच तडफेने पाठिंबा देताना टाळ्या, शिट्ट्यांसह आरोळ्यांचा गजर होत होता. या महोत्सवाच्या नव्हे, तर तरुणाईच्या उत्सवाच्या समारोपप्रसंगी तरुणाई भावनाविवश झाली. पुन्हा त्याच जोमाने पुढील वर्षी एकत्र येण्याचा शब्द देऊन निरोप घेण्यात आला.

> युवा महोत्सवाचे उद्दिष्ट निखळ आनंद देणे व घेणे, संस्कृती जपणे व वाचविणे, समाजाला संदेश देणे. समाजाचे प्रबोधन करणे हे आहे.
>
> **डॉ. दिगंबर शिर्के**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विजेत्यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी, प्रभाकर देशमुख यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. यावेळी डॉ. शिर्के, श्री. दळवी, श्री. देशमुख, प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे आदींची भाषणे झाली.

अंतिम निकाल पुढीलप्रमाणे : सांघिक स्पर्धा प्रकार : अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, प्रथम. कुलगुरू स्वर्गीय डॉ. अप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक - मुधोजी कॉलेज, फलटण.

सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक- दहिवडी कॉलेज, सरदार दादासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक- किसन वीर महाविद्यालय, वाई.

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरते गौरव चषक : नृत्य विभाग विभागून- दहिवडी कॉलेज, किसन वीर महाविद्यालय, वाई व विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. नाट्य विभाग- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. संगीत विभाग- विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर. कला विभाग- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर. वाङ्मय विभाग- शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कऱ्हाड.

लोकमत

# युवा महोत्सवात 'विवेकानंद'ची बाजी

## सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप जिंकली : विविध स्पर्धांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या आणि दहीवडी महाविद्यालय, दहीवडी यांच्या संयुक्त विद्यमाने दहीवडी (जि. सातारा) येथे आयोजित केलेल्या ४३ व्या युवा महोत्सवामध्ये प्रथम कुलगुरू दिवंगत डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने मिळविला. तर अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने पटकाविला.

विविध कला प्रकारांतील विजेत्यांची शुक्रवारी घोषणा करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ आयोजित युवा महोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. एकापेक्षा एक बहारदार सादरीकरण झाले. विविध स्पर्धांमधील विजेते पुढीलप्रमाणे : सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक - दहीवडी कॉलेज दहीवडी, सरदार दादासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक - किसनवीर महाविद्यालय, वाई. विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरता गौरव चषक नृत्य विभागात दहीवडी कॉलेज, किसनवीर, विवेकानंद महाविद्यालय यांना विभागून देण्यात आला; तर नाट्य आणि संगीत विभागात विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, कला विभागात देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर तर वाङ्मय विभागात गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कऱ्हाडने फिरता गौरव चषक मिळविला.

### वेगवेगळ्या कला प्रकारातील निकाल असा

▪ **शास्त्रीय नृत्य :** विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (प्रथम), कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कोल्हापूर (द्वितीय), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (तृतीय) नकला - गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली (प्रथम), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (द्वितीय), विलिंग्डन कॉलेज, सांगली (तृतीय) ▪ **एकपात्री अभिनय :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली (प्रथम), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (द्वितीय), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (तृतीय) ▪ **सुगम गायन :** आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, पलूस (प्रथम) लालबहादूर शास्त्री आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज सातारा (द्वितीय), गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कऱ्हाड (तृतीय) ▪ **शास्त्रीय गायन :** मुधोजी कॉलेज फलटण (प्रथम) दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी (द्वितीय), राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी साखराळे (तृतीय) ▪ **पाश्चिमात्य एकल गायन :** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (प्रथम), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा (द्वितीय) देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर (तृतीय) ▪ **शास्त्रीय सुरुवाद्य :** मुधोजी कॉलेज फलटण (प्रथम ), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (द्वितीय), विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (तृतीय), ▪ **शास्त्रीय तालवाद्य :** सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (प्रथम), मुधोजी कॉलेज, फलटण (द्वितीय), महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (तृतीय) ▪ **पाश्चिमात्य एकलवादन :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली (प्रथम), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (द्वितीय), सायबर कॉलेज, कोल्हापूर (तृतीय) ▪ **स्थळचित्र :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (प्रथम), विश्वासराव नाईक कला, वाणिज्य व बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय शिराळा (द्वितीय) के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर (तृतीय) ▪ **व्यंगचित्र :** देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (प्रथम), मुधोजी कॉलेज फलटण (द्वितीय), विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (तृतीय).

# ‘विवेकानंद’ला सर्वसाधारण विजेतपद

## दहिवडी येथे विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप

**सकाळ वृत्तसेवा**

दहिवडी, ता. १३ : तरुणाईच्या जल्लोषात शिवाजी विद्यापीठाच्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचा समारोप झाला. कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने सर्वसाधारण विजेतपद पटकाविले. सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील १०० पेक्षा जास्त महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी सलग दोन दिवस तब्बल ३४ कलाप्रकारांचे सादरीकरण केले.




**दहिवडी :** येथे झालेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सर्वसाधारण विजेतपद पटकाविणारा कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाचा संघ.

विजेत्यांना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष चंद्रकांत दळवी, प्रभाकर देशमुख यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. अंतिम निकाल असा : सांघिक स्पर्धा प्रकार - अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा सर्वसाधारण विजेतपद - विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, कुलगुरू स्वर्गीय डॉ. अप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा सर्वसाधारण विजेतपद मुधोजी महाविद्यालय, फलटण. सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक- दहिवडी महाविद्यालय, सरदार दादासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक- किसन वीर महाविद्यालय, वाई.

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरते गौरव चषक : नृत्य विभाग विभागून- दहिवडी महाविद्यालय, किसन वीर महाविद्यालय, वाई व विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर. नाट्य विभाग- विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर. संगीत विभाग- विवेकानंद विद्यालय, कोल्हापूर. कला विभाग- देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर. वाङ्मय विभाग- शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कऱ्हाड.

लोकमत

# युवा महोत्सवात 'विवेकानंद'ची बाजी

## सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप जिंकली : विविध स्पर्धांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या आणि दहीवडी महाविद्यालय, दहीवडी यांच्या संयुक्त विद्यमाने दहीवडी (जि. सातारा) येथे आयोजित केलेल्या ४३ व्या युवा महोत्सवामध्ये प्रथम कुलगुरू दिवंगत डॉ. आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाने मिळविला. तर अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिप फिरता चषक कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालयाने पटकाविला.

विविध कला प्रकारांतील विजेत्यांची शुक्रवारी घोषणा करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ आयोजित युवा महोत्सव अत्यंत उत्साहात पार पडला. एकापेक्षा एक बहारदार सादरीकरण झाले. विविध स्पर्धांमधील विजेते पुढीलप्रमाणे : सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक - दहीवडी कॉलेज दहीवडी, सरदार दादासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक - किसनवीर महाविद्यालय, वाई. विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त फिरता गौरव चषक नृत्य विभागात दहीवडी कॉलेज, किसनवीर, विवेकानंद महाविद्यालय यांना विभागून देण्यात आला; तर नाट्य आणि संगीत विभागात विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर, कला विभागात देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर तर वाङ्मय विभागात गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कऱ्हाडने फिरता गौरव चषक मिळविला.

### वेगवेगळ्या कला प्रकारातील निकाल असा

▪ **शास्त्रीय नृत्य :** विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (प्रथम), कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, कोल्हापूर (द्वितीय), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (तृतीय) नकला - गणपतराव आरवाडे कॉलेज ऑफ कॉमर्स, सांगली (प्रथम), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (द्वितीय), विलिंग्डन कॉलेज, सांगली (तृतीय) ▪ **एकपात्री अभिनय :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली (प्रथम), दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, इचलकरंजी (द्वितीय), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (तृतीय) ▪ **सुगम गायन :** आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, पलूस (प्रथम) लालबहादूर शास्त्री आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज सातारा (द्वितीय), गव्हर्न्मेंट कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, कऱ्हाड (तृतीय) ▪ **शास्त्रीय गायन :** मुधोजी कॉलेज फलटण (प्रथम) दत्ताजीराव कदम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इचलकरंजी (द्वितीय), राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी साखराळे (तृतीय) ▪ **पाश्चिमात्य एकल गायन :** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (प्रथम), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स सातारा (द्वितीय) देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर (तृतीय) ▪ **शास्त्रीय सुरवाद्य :** मुधोजी कॉलेज फलटण (प्रथम ), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (द्वितीय), विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (तृतीय), ▪ **शास्त्रीय तालवाद्य :** सर्व अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (प्रथम), मुधोजी कॉलेज, फलटण (द्वितीय), महावीर महाविद्यालय, कोल्हापूर (तृतीय) ▪ **पाश्चिमात्य एकलवादन :** वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सांगली (प्रथम), विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (द्वितीय), सायबर कॉलेज, कोल्हापूर (तृतीय) ▪ **स्थळचित्र :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (प्रथम), विश्वासराव नाईक कला, वाणिज्य व बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय शिराळा (द्वितीय) के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर (तृतीय) ▪ **व्यंगचित्र :** देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर (प्रथम), मुधोजी कॉलेज फलटण (द्वितीय), विवेकानंद कॉलेज कोल्हापूर (तृतीय).

लोकमत

# कला दाखविण्यासाठी तरुणांनी रात्र जागविली!

## सादरीकरणासाठी धडपड; महोत्सवस्थळी सळसळता उत्साह, संधीचे सोने करण्यासाठी पहाटेपर्यंत सुरु होता सराव

प्रगती जाधव-पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**दहिवडी:** मध्यवर्ती युवा महोत्सवात सादरीकरणासाठी मिळालेल्या संधीचे सोने करण्याची धडपड प्रत्येक संघात बघायला मिळते. मिळेल त्या ठिकाणी आणि असेल त्या अवस्थेत पाठांतराबरोबरच नृत्य आणि अभिनयाचा सराव करताना विद्यार्थी महोत्सव स्थळी दिसत होते. कोणाला पराभूत करण्यापेक्षा स्वतः विजयी होण्यासाठी मुलांनी अक्षरशः रात्र जागविली.

दहिवडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजकडे ४३व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे यजमानपद आहे. त्यामुळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या उत्साहाची अलोट गर्दी अनुभवायला मिळत आहे. सराव पूर्ण झाल्यानंतर अंतिम कला सादर करण्यापूर्वी रंगमंचाचा अंदाज घेणे महत्त्वाचे असते. त्यामुळे दिवसभर रंगमंचाच्या आसपास राहून



दहिवडी येथे सुरु असलेल्या युवा महोत्सवात गुरुवारी एका महाविद्यालयाच्या तरुणांनी कलाविष्कार सादर केला. (छाया : अनिल बिटले, पुसेगाव)

दिवसभरातील कार्यक्रम विद्यार्थ्यांनी अनुभवले. बुधवारी रात्री पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाचा समारोप झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी रंगमंचावर सादरीकरणाचा सराव सुरू केला.

अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने भल्या पहाटेपर्यंत विद्यार्थ्यांचा हा सराव सुरू होता. एक-दोनदा सराव केल्यानंतर प्रत्येकाला पुढच्या स्पर्धकांसाठी रंगमंच उपलब्ध करून द्यायचा होता. त्यामुळे आवश्यक तेवढे सराव रंगमंचावर करून विद्यार्थी परतले

### ना इर्षा ना गेमा!

मध्यवर्ती युवा महोत्सवात सातारा, सांगली आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांतून स्पर्धक सहभागी झाले आहेत. विविध कलाविष्कार सादर करताना परस्परांना प्रोत्साहन देण्याची तरुणाईची स्टाईल वाखाणण्याजोगी होती. आपापला प्रयोग झाला की, प्रेक्षकांमध्ये बसून आपल्यापेक्षा कोणाचा कलाविष्कार चांगला झाला, याची चर्चा करण्याबरोबरच रंगमंचावर असणाऱ्या स्पर्धकांना टाळ्यांच्या कडकडाटाने प्रोत्साहन देत होते.



शिवाजी विद्यापीठ

मध्यवर्ती युवा महोत्सव



दहिवडी, ता. माण येथे सुरु असलेल्या युवा महोत्सवात गुरुवारी तरुणांनी एकांकिका सादर केल्या. त्यातून सामाजिक विषयांवर भाष्य करण्यात आले. (छाया : प्रगती जाधव-पाटील)

### एकांकिकांमधून सामाजिक विषयांचा जागर!

**दहीवडी:** येथे सुरु असलेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात दुसरा दिवस गाजला तो एकलगायन, समूहगायन, एकपात्री, शास्त्रीय नृत्य यासह एकांकिका, वादन, गायन आणि रेखाटन यामुळे. एकांकिका स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी संवेदनशीलपणे मांडलेली सामाजिक परिस्थिती विशेष भाव खाऊन गेली. सातारा, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतून मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी दाखल झालेल्या तरुणाईने दुसरा दिवसही 'फुल ऑन

लोकमत

## नृत्य अन् अभिनयाचा सराव : दहिवडीतील रंगमंचही जागला

# कौशल्य दाखविण्यासाठी तरुणांनी जागविली रात्र !

**प्रगती जाधव-पाटील**
लोकमत न्यूज नेटवर्क

**सातारा :** मध्यवर्ती युवा महोत्सवात सादरीकरणासाठी मिळालेल्या संधीचे सोने करण्याची धडपड प्रत्येक संघात बघायला मिळते. मिळेल त्या ठिकाणी आणि असेल त्या अवस्थेत पाठांतराबरोबरच नृत्य आणि अभिनयाचा सराव करताना विद्यार्थी महोत्सव स्थळी दिसत होते. कोणाला पराभूत करण्यापेक्षा स्वतः विजयी होण्यासाठी मुलांनी अक्षरशः रात्र जागविली.

**४३ वा मध्यवर्ती**
**युवा महोत्सव**

दहिवडी येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजकडे ४३व्या मध्यवर्ती युवा महोत्सवाचे यजमानपद आहे. त्यामुळे महाविद्यालयात विद्यार्थ्यांची आणि त्यांच्या उत्साहाची अलोट गर्दी अनुभवायला मिळत आहे. सराव पूर्ण झाल्यानंतर अंतिम कला सादर करण्यापूर्वी रंगमंचाचा अंदाज घेणे महत्त्वाचे असते. त्यामुळे दिवसभर रंगमंचाच्या आसपास राहून दिवसभरातील कार्यक्रम विद्यार्थ्यांनी अनुभवले. बुधवारी रात्री पहिल्या दिवसाच्या कार्यक्रमाचा समारोप झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी रंगमंचावर सादरीकरणाचा सराव सुरू केला.

शिस्तबद्ध पद्धतीने पहाटेपर्यंत विद्यार्थ्यांचा हा सराव सुरू होता. एक-दोनदा सराव केल्यानंतर प्रत्येकाला पुढच्या स्पर्धकांसाठी रंगमंच उपलब्ध करून द्यायचा होता. त्यामुळे आवश्यक तेवढे सराव रंगमंचावर करून विद्यार्थी परतले. पहाटेपर्यंत सरावाचा हा आवाज कोणत्याही संगीताशिवाय सुरू होता, हे विशेष.



दहिवडी येथे सुरू असलेल्या युवा महोत्सवात तरुणांनी कलाविष्कार सादर केला. (छाया : अनिल बिंटले)

### ना ईर्षा ना गेमा..!

१ मध्यवर्ती युवा महोत्सवात सातारा, सांगली आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांतून स्पर्धक सहभागी झाले आहेत. विविध कलाविष्कार सादर करताना परस्परांना प्रोत्साहन देण्याची तरुणाईची स्टाईल वाखाणण्याजोगी होती.

२ आपापला प्रयोग झाला की, प्रेक्षकांमध्ये बसून आपल्यापेक्षा कोणाचा कलाविष्कार चांगला झाला, याची चर्चा करण्याबरोबरच रंगमंचावर असणाऱ्या स्पर्धकांना टाळ्यांच्या कडकडाटाने प्रोत्साहन देत होते.

### 'व्हायरल'चा फटका विद्यार्थ्यांनाही !

युवा महोत्सवासाठी आलेल्या काही विद्यार्थ्यांना व्हायरल आजारांनी घेरले होते. सुमारे महिनाभर सराव केल्यानंतर आता स्वतःच्या बदली अन्य कोणताही पर्याय देणे अशक्य होते. काही जिगरबाज कलावंतांनी आदल्या दिवशी चक्क सलाईन लावून दुसऱ्या दिवशी आपली कला सादर केली. प्रेक्षकांच्या समोर कला सादर करताना देहभान हरपून केवळ सर्वोत्कृष्ट सादरीकरण करण्याचे ठरवून विद्यार्थ्यांनी सांघिक भावनेचे दर्शन घडविले.



कला सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांची जबाबदारी आमची आहे. इथे कोणाही विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घेतली आहे. सादरीकरण केल्यानंतर त्याचे योग्य परीक्षण व्हावे यासाठी काटेकोर यंत्रणा राबविली.

**- प्रा. डॉ. प्रकाश गायकवाड,**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत


# सोशल मीडियावर महाविद्यालयीन तरुणाईचा घणाघात

## स्थळ छायाचित्रण प्रकार : गरजेचा मोबाइल डोकेदुखी का झाला याची केली विद्यार्थ्यांनी कल्पक मांडणी

**दहिवडी:** शिक्षणाची गरज म्हणून मुलांच्या हातात आलेल्या मोबाइलने त्यांचे अवघे विश्वच पोखरून काढले आहे. तरुणाईला याचं व्यसन लागलंय आणि मोबाइलचे त्यांच्या आयुष्यावर काय परिणाम होतात, याची त्यांना कल्पना नाही असा सार्वत्रिक समज आहे. हा समज खोडून काढत सोशल मीडियाच्या अतिवापरावर तरुणाईने सांघिक रचनाकृतीद्वारे घणाघात केला आहे.

दहिवडी येथे रंगलेल्या ४३ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी साकारलेली टाकाऊपासून टिकाऊची कलाकृती विशेष आकर्षणाचे केंद्र ठरली. मोबाइल आणि त्याचे परिणाम दुष्परिणाम यासह युवा महोत्सव अशी थीम विद्यार्थ्यांना देण्यात आली होती. बहुतांश विद्यार्थ्यांनी मोबाइल आणि त्याचे परिणाम, दुष्परिणाम यावर सडेतोड भाष्य केले.

मोबाइलमुळे ओस पडलेले क्रीडांगण, कुटुंब एकत्र असूनही वेगवेगळ्या विश्वात रमणारे कुटुंबीय, यासह समाजमाध्यमाद्वारे पेरल्या गेलेल्या विषयामुळे उद्भवणारी सामाजिक परिस्थिती यावरही नेमक्या पद्धतीने भाष्य करण्यात तरुणाई यशस्वी झाल्याचे चित्र महोत्सवात पाहायला मिळते.



**दहिवडी (ता. माण) येथे सुरू असलेल्या युवा महोत्सवात तरुणाईने सांघिक रचनाकृतीद्वारे सोशल मीडियाच्या अतिवापरावर घणाघात केला आहे.**

(छाया : प्रगती जाधव-पाटील)

### हाती आलं पण पवित्र नाही झालं!

१ कोरोना काळात ज्या मोबाइलने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष पुढे नेले, त्याच मोबाइलच्या अतिवापराने महाविद्यालयीन वयात मुलांचे वर्षही वाया गेले. कोरोना काळात हाती आलेला मोबाइल पवित्र वाटत होता. त्यानंतर मात्र त्याचं पावित्र्य राहिलं नाही. मोबाइल वापरासह समाजमाध्यमातील कोणत्या गोष्टीने आपल्याला मागे सारले, असे आत्मचिंतन करायला इथल्या कलाकृतींनी भाग पाडले.

### पुस्तक आणि मोबाइलचीही तुलना!

२ **दहिवडी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या रचना कृतींमध्ये विद्यार्थ्यांनी पुस्तक आणि मोबाइल यांची तुलना करणारी कलाकृती सादर केली. पुस्तकांच्या तुलनेत मोबाइलवरचा खर्च वाढला असला, तरी दर्जा आणि ज्ञानाच्या बाबतीत पुस्तक सरस असल्याचे यात मांडण्यात आले आहे. मोबाइल दुकानातील गर्दी आणि ग्रंथालयातील ओसपणाही या कलाकृतीतून परखडपणे मांडण्यात आला.**



कोरोना काळात सोशल मीडियामुळे शैक्षणिक नुकसान टाळता आले. पण त्याचे दीर्घकालीन परिणाम आत्ताच्या पिढीला सहन करावे लागत आहेत. हाती आलेल्या स्मार्टफोनचा वापर कसा करावा, याची माहिती नसल्याने होणाऱ्या गोंधळाविषयी विद्यार्थ्यांनी उत्तम भाष्य केले आहे.

**- केवल यादव,** कलाकार, कोल्हापूर

लोकमत



दहिवडी, ता. माण येथे सुरू असलेल्या युवा महोत्सवात गुरुवारी तरुणांनी एकांकिका सादर केल्या. त्यातून सामाजिक विषयांवर भाष्य करण्यात आले. (छाया : प्रगती जाधव-पाटील)

# एकांकिकांमधून सामाजिक विषयांचा जागर!

**दहीवडी:** येथे सुरू असलेल्या मध्यवर्ती युवा महोत्सवात दुसरा दिवस गाजला तो एकलगायन, समूहगायन, एकपात्री, शास्त्रीय नृत्य यासह एकांकिका, वादन, गायन आणि रेखाटन यामुळे. एकांकिका स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी संवेदनशीलपणे मांडलेली सामाजिक परिस्थिती विशेष भाव खाऊन गेली. सातारा, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतून मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी दाखल झालेल्या तरुणाईने दुसरा दिवसही 'फुल ऑन एनर्जीने साजरा केला. दहीवडी महाविद्यालय परिसरात उभारण्यात आलेल्या नऊ रंगमंचांवर आपले कलागुण सादर करताना विद्यार्थ्यांनी विविध विषयांना स्पर्श करत वस्तुस्थिती मांडण्याचा प्रयत्न आपल्या कलेच्या माध्यमातून केला.

## संगीत, शास्त्रीय नृत्य कलांनाही प्रोत्साहन

मध्यवर्ती युवा महोत्सवात लोककला आणि एकांकिकेबरोबरच यंदा प्रेक्षकांनी संगीत आणि शास्त्रीय नृत्यालाही पसंती दिली. विविध रंगमंचांवर सुरू असलेल्या या कार्यक्रमांना उपस्थिती लावून स्पर्धकांचे मनोबल वाढविण्याचा प्रयत्न रसिक प्रेक्षकांनी केला. प्रेक्षकांच्या प्रतिसादाने कला सादर करणाऱ्यांना आणखी हुरूप आला.

## कुंचल्यातून कागदावर अवतरले महाविद्यालय!

स्थळचित्रण प्रकारात सहभागी झालेल्या स्पर्धकांनी आपल्या कुंचल्यातून महाविद्यालय परिसर रेखाटला. महाविद्यालयाच्या क्रीडांगण, प्रवेशद्वार, ग्रंथालय, जिमखाना, हॉस्टेल आदी ठिकाणे स्पर्धक विद्यार्थ्यांनी कागदावर रेखाटली.

## कॉलेज कोडने ओळख

सातारा, सांगली आणि कोल्हापूर या तीन जिल्ह्यांमधून शंभराहून अधिक संघ मध्यवर्ती युवा महोत्सवात सहभागी झाले आहेत. या संघांची ओळख पटू नये, म्हणून महाविद्यालयांना कोड ठरवून दिला आहे. स्पर्धकांना कोड विचारून प्रवेशित करण्यात येत होते.

## विषय आणि अभिनय बिनतोड!

युवा महोत्सवानिमित्त नऊ संघांनी एकांकिका सादर केल्या. या एकांकिकांचे विषय समाजाचा वेध घेणारे, पारंपरिक रुढी- परंपरांना आव्हान देणारे, याबरोबरच तरुणाईमध्ये स्फुरण भरणारे होते. विषयाच्या निवडीबरोबरच त्याचे सादरीकरण करतानाही विद्यार्थ्यांनी जीवतोड मेहनत घेतली. अव्वल क्रमांक द्यायचा, असा प्रश्न उपस्थित व्हावा, असे सादरीकरण झाले.

तरुण भारत संवाद

बुधवार, ४ ऑक्टोबर २०२३

# विवेकानंद कॉलेज ९ पदके मिळवून अव्वलस्थानी

## मुरगूड येथे ४३ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव : कॉलेज ऑफ कॉमर्सने ६ तर न्यू कॉलेजकडून ६ पदकांची लयलूट

वार्ताहर
मुरगूड

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने तब्बल ९ पदके पटकावत महोत्सवात वर्चस्व मिळविले. तर देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर यांनी ६ तर न्यू कॉलेज कोल्हापूरने ६ पदके पटकावली आहेत.

या महोत्सवातून विजयी झालेल्या संघाची ११ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत सातारा जिल्ह्यातील दहिवडी कॉलेज येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे. येथील युवा महोत्सवातून अनुक्रमे पहिल्या तीन विजयी झालेल्या महाविद्यालयांची नांवे अशी :

**लोककला** : विवेकानंद कॉलेज, (कोल्हापूर), श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, (इचलकरंजी), देशभक्त रत्नाप्पाकुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, (कोल्हापूर.)

**लोकनृत्य** : दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज (इचलकरंजी), व्यंकटेश महाविद्यालय (इचलकरंजी),जयसिंगपूर कॉलेज (जयसिंगपूर).

**मूकनाटय** : भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजीनिरिंग(कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय (वारणानगर).

**नकला** : दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज(इचलकरंजी), भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग (कोल्हापूर), डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजीनिरिंग (कोल्हापूर).

**मराठी वक्तृत्व** : न्यू कॉलेज (कोल्हापूर), श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय (इचलकरंजी), डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजीनिरिंग (कोल्हापूर).

**हिंदी वक्तृत्व** : न्यू कॉलेज, (कोल्हापूर), विवेकानंद कॉलेज,(कोल्हापूर), दुधसाखर महाविद्यालय, (बिद्री).

**इंग्रजी वक्तृत्व** : शहाजी लॉ कॉलेज, (कोल्हापूर), केआयटी कॉलेज,(कोल्हापूर), जयसिंगपूर कॉलेज (जयसिंगपूर).

**वादविवाद** : दुधसाखर महाविद्यालय(बिद्री), न्यू कॉलेज( कोल्हापूर), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर).**सुगमगायन** : सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर), न्यू कॉलेज (कोल्हापूर). **लोकसंगीत वाद्यवृंद** : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), न्यू कॉलेज (कोल्हापूर), व्यंकटेश महाविद्यालय (इचलकरंजी). **लघुनाटिका** : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), न्यू कॉलेज(कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर).**एकांकिका** : देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर), विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर). **समुहगीत** : विवेकानंद कॉलेज(कोल्हापूर), राजाराम कॉलेज (कोल्हापूर), देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स (कोल्हापूर).**पथनाट्य** : विवेकानंद कॉलेज (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण महाविद्यालय(हलकर्णी), दुधसाखर महाविद्यालय (बिद्री)**प्रश्नमंजुषा** : विवेकानंद पाटील (कोल्हापूर), राजाराम कॉलेज (कोल्हापूर).

युवा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सदाशिवराव मंडलिक महाविद्यालया बरोबरच जयशिवराय एज्युकेशन सोसायटीच्या स्टाफने परिश्रम घेतले.



मुरगूड : येथील युवा महोत्सवात लोकसंगीत वाद्यवृंद सादर करताना विवेकानंद महाविद्यालयाचे विद्यार्थी.

पुण्य नगरी

कोल्हापूर, बुधवार, ४ ऑक्टोबर २०२३

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेज अव्वल

## देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, न्यू कॉलेजचेही यश

**मुरगूड : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग व येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालयात आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेज कोल्हापूरने तब्बल ९ क्रमांक पटकावत महोत्सवात वर्चस्व मिळवले. देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर यांनी ६, तर न्यू कॉलेज कोल्हापूरने ६ क्रमांक पटकावले आहेत.

महोत्सवातून विजयी झालेल्या संघाची ११ ते १३ नोव्हेंबर या कालावधीत सातारा जिल्ह्यातील दहिवडी कॉलेज येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.

येथील युवा महोत्सवातून अनुक्रमे पहिल्या तीन विजयी झालेल्या महाविद्यालयांची नावे अशी : **लोककला :** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर.

**लोकनृत्य :** दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स, कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर.

**मूकनाट्य :** भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर.

नकला : दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स, कॉमर्स कॉलेज, इचलकरंजी, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग.

**मराठी वक्तृत्व :** न्यू कॉलेज, कोल्हापूर, श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर.

**हिंदी वक्तृत्व :** न्यू कॉलेज, कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, दूधसाखर महाविद्यालय, बिद्री.

**इंग्रजी वक्तृत्व :** शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर, के आयटी कॉलेज, कोल्हापूर, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर. वादविवाद : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, न्यू कॉलेज, कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**सुगम गायन :** सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर. लोकसंगीत वाद्यवृंद - विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर, व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी.

**लघुनाटिका :** विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर.

सकाळ

कोल्हापूर, मंगळवार, ३ ऑक्टोबर २०२३

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव : लोकनृत्यात दत्ताजीराव कदम कॉलेज प्रथम

# लोककलेत विवेकानंद कॉलेज अव्वल

▸ सकाळ वृत्तसेवा

मुरगूड, ता.२ : येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये विद्यार्थी कलाकारांनी आपला कलाविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

लोककलेमध्ये कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने, तर लोकनृत्य कलाप्रकारात इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स,कॉमर्स कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. येथील मंडलिक महाविद्यालयाच्या लोकनेते सदाशिवराव मंडलिक सांस्कृतिक मंचच्या भव्य सभागृहामध्ये झालेल्या या युवा महोत्सवात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ७६ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी १४ कला प्रकारामध्ये सहभाग नोंदवला.

महोत्सवातील विविध कलाप्रकारातील निकाल (अनुक्रमे) असा :

**लोककला :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर.

**लोकनृत्य :** दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी, जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**मूकनाट्य :** भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर,देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर,यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर.

**नकला :** दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर,डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.



मुरगूड : येथील मंडलिक महाविद्यालयाच्या प्रांगणात जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये लोककला सादर करताना महाविद्यालयीन युवती.

**मराठी वक्तृत्व :** न्यू कॉलेज कोल्हापूर, श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, डी.वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.

**हिंदी वक्तृत्व :** न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दूध साखर महाविद्यालय बिद्री.

**इंग्रजी वक्तृत्व:** शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, के.आय.टी.कॉलेज कोल्हापूर, जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**वादविवाद :** दूध साखर महाविद्यालय बिद्री, न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**सुगम गायन :** सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, न्यू कॉलेज कोल्हापूर.

**लोकसंगीत वाद्यवृंद :** विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज कोल्हापूर, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी.

**लघुनाटिका :** विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

**एकांकिका :** रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ

**समूहगीत :** विवेकानंद कॉलेज, राजाराम कॉलेज कोल्हापूर, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

**पथनाट्य :** विवेकानंद कॉलेज, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णी आणि दूधसाखर महाविद्यालय बिद्री.

२ पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ३ ऑक्टोबर २०२३

# लोककलेत विवेकानंद, लोकनृत्यात कदम कॉलेज प्रथम

## मुरगूड येथे शिवाजी विद्यापीठाचा युवा महोत्सव

**मुरगूड : पुढारी वृत्तसेवा**

येथील मंडलिक महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने आयोजित ४३ व्या कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोककला स्पर्धेत कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने प्रथम क्रमांक मिळविला तर लोकनृत्य प्रकारात इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.

जिल्हा युवा महोत्सवात एकूण १५ कला प्रकारच्या स्पर्धांचा समावेश होता. त्याचा निकाल असा - लोककलेत दुसरा क्रमांक श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय क्रमांक - देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर, लोकनृत्यात दुसरा व तिसरा क्रमांक अनुक्रमे व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी व जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**मूक नाट्य** - प्रथम भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, द्वितीय कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणानगर. नकला स्पर्धेत - प्रथम डी. के. कॉलेज इचलकरंजी, द्वितीय भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, तृतीय डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग. मराठी वक्तृत्व प्रथम - न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय - डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर. हिंदी वक्तृत्व प्रथम - न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय - दूधसाखर महाविद्यालय बिद्री. इंग्रजी वक्तृत्व प्रथम - शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - केआयटी कॉलेज कोल्हापूर, तृतीय - जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर. वादविवाद प्रथम - दूधसाखर महाविद्यालय बिद्री, द्वितीय न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**सुगम गायन** - प्रथम - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, द्वितीय - देशभक्त रत्नाप्पाणा कुंभार, तृतीय - न्यू कॉलेज कोल्हापूर. लोकसंगीत वाद्यवृंद प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. लघुनाटिका स्पर्धा प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय - कॉमर्स कॉलेज कोल्हापूर. एकांकिका प्रथम - देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, द्वितीय - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय - सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. समूहगीत प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - राजाराम कॉलेज कोल्हापूर, तृतीय - देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर. पथनाट्य प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णी, तृतीय - दूधसाखर महाविद्यालय बिद्री. प्रश्नमंजुषा प्रथम - विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय - राजाराम कॉलेज कोल्हापूर. या विजेत्या स्पर्धकांची दि. ११ ते १३ ऑक्टोबरपर्यंत दहीवडी कॉलेज (जि. सातारा) येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सवासाठी निवड झाली आहे.



मुरगूड : युवा महोत्सवात कला सादर करताना युवक व युवती.

## १५ कला प्रकारांचे सादरीकरण

**मुरगूड : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग व सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुरगूडमध्ये आयोजित जिल्हा युवा महोत्सवात १५ प्रकारच्या कलांचे बाराशे कलाकारांकडून सादरीकरण झाले.

कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२३ - २४ सालाचा ४३ वा जिल्हा युवा महोत्सव येथील मंडलिक महाविद्यालयाच्या प्रांगणात लोकनेते सदाशिवराव मंडलिक रंगमंचावर सोमवारी पहाटेपर्यंत झाला. या महोत्सवात जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयांतील १२०० कलाकारांचा समावेश होता.

महोत्सव यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. अर्जुन कुंभार, उपप्राचार्य डॉ. टी. एम. पाटील, प्रा. डी. पी. साळुंखे, डॉ. शिवाजी होडगे, डॉ. उदय शिंदे, डॉ. अद्वैत जोशी आदींनी परिश्रम घेतले.

दै. महासत्ता दि. 03/10/2023

# लोकनृत्यात इचलकरंजीचे डी.के.ए.एस.सी कॉलेज प्रथम

## मुरगूडमध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात

मुरगूड ता.२(प्रतिनिधी)–

मुरगूड येथे सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्यावतीने आयोजीत ४३ व्या कोल्हापूर जिल्हास्तरीय युवा महोत्सवात लोककला स्पर्धेत कोल्हापूरच्या कॉलेजने प्रथम क्रमाक मिळविला तर लोकनृत्यप्रकारात इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम महाविद्यालयाने प्रथम क्रमांक पटकाविला.

जिल्हा युवा महोत्सवात एकूण १५ कला प्रकारच्या स्पर्धांचा समावेश होता. त्याचा निकाल असा : लोककलेत दुसरा क्रमाक श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी. तृतीय क्रमांक देशभक्त रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, कोल्हापूर



लोकनृत्यात दुसरा व तिसरा क्रमांक अनुक्रमे व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी व जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**मूक नाट्य** – प्रथम – भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, द्वितीय – कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, तृतीय – यशवंतराव चव्हाण महाविद्यालय वारणानगर.

**नकला स्पर्धेत**– प्रथम – डी. के. कॉलेज इचलकरंजी, द्वितीय– भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग कोल्हापूर, तृतीय – डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग.

**मराठी वक्तृत्व** – प्रथम– न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – श्रीमती आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, तृतीय– डी. वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर,

**हिंदी वक्तृत्व** – प्रथम–न्यू कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, तृतीय– दुधसाखर महाविद्यालय बिद्री.

**इंग्रजी वक्तृत्व** – प्रथम – शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – के आय टी कॉलेज कोल्हापूर, तृतीय – जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर.

**वादविवाद** – प्रथम – दुधसाखर महाविद्यालय बिद्री, द्वितीय – न्यू कॉलेज कोल्हापूर तृतीय – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**सुगम गायन**– प्रथम– सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, द्वितीय – देशभक्त रत्नाप्पाणा कुंभार कॉलेज, तृतीय– न्यू कॉलेज ,कोल्हापूर.

**लोकसंगीत वाद्यवृंद**–प्रथम– विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय – व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी.

**लघुनाटिका स्पर्धा** – प्रथम – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – न्यू कॉलेज कोल्हापूर, तृतीय – कॉमर्स कॉलेज, कोल्हापूर.

**एकांकिका** – प्रथम – देशभक्त रत्नापाणा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, द्वितीय – विवेकानंद कॉलेज लोल्हापूर, तृतीय –सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर

**समूहगीत** – प्रथम – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – राजाराम कॉलेज कोल्हापूर, तृतीय– देशभक्त रत्नापाणा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर.

**पथनाट्य प्रथम** – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णी, तृतीय –दूधसाखर महाविद्यालय बिद्री.

**प्रश्नमंजूषा** – प्रथम – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, द्वितीय – राजाराम कॉलेज कोल्हापूर.

या विजेत्या स्पर्धकांची दि.११ ते १३ ऑक्टोबर २०२३ रोजी दहीवडी कॉलेज जि. सातारा येथे होणाऱ्या मध्यवर्ती युवा महोत्सव साठी निवड झाली आहे.

सकाळ

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव : लोकनृत्यात दत्ताजीराव कदम कॉलेज प्रथम

# लोककलेत विवेकानंद कॉलेज अव्वल

सकाळ वृत्तसेवा

मुरगूड, ता. २ : येथील सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ४३ व्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये विद्यार्थी कलाकारांनी आपला कलाविष्कार सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.

लोककलेमध्ये कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने, तर लोकनृत्य कलाप्रकारात इचलकरंजीच्या दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स,कॉमर्स कॉलेजने प्रथम क्रमांक पटकावला. येथील मंडलिक महाविद्यालयाच्या लोकनेते सदाशिवराव मंडलिक सांस्कृतिक मंचच्या भव्य सभागृहामध्ये झालेल्या या युवा महोत्सवात कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ७६ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी १४ कला प्रकारामध्ये सहभाग नोंदवला.

महोत्सवातील विविध कलाप्रकारातील निकाल (अनुक्रमे) असा :

**लोककला :** विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, श्रीमती अक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर.

**लोकनृत्य :** दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी, जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**मूकनाट्य :** भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर,देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर,यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय वारणानगर.

**नकला :** दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर,डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.



मुरगूड : येथील मंडलिक महाविद्यालयाच्या प्रांगणात जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये लोककला सादर करताना महाविद्यालयीन युवती.

**मराठी वक्तृत्व :** न्यू कॉलेज कोल्हापूर, श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, डी.वाय. पाटील प्रतिष्ठान कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर.

**हिंदी वक्तृत्व :** न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दूध साखर महाविद्यालय बिद्री.

**इंग्रजी वक्तृत्व:** शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर, के.आय.टी.कॉलेज कोल्हापूर, जयसिंगपूर कॉलेज जयसिंगपूर.

**वादविवाद :** दूध साखर महाविद्यालय बिद्री, न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर.

**सुगम गायन :** सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, न्यू कॉलेज कोल्हापूर.

**लोकसंगीत वाद्यवृंद :** विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज कोल्हापूर, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी.

**लघुनाटिका :** विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

**एकांकिका :** रत्नापाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज, सर्व अधिविभाग शिवाजी विद्यापीठ

**समूहगीत :** विवेकानंद कॉलेज, राजाराम कॉलेज कोल्हापूर, रत्नाप्पाण्णा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

**पथनाट्य :** विवेकानंद कॉलेज, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय हलकर्णी आणि दूधसाखर महाविद्यालय बिद्री.